**प्रेस नोट** **दिनांक :- ०१/०९/२०२३**

# दहशतवादी हल्ल्याची खोटी माहिती देवून जनमानसात दहशत पसरविणाऱ्या आरोपीस मुंबई गुन्हे शाखेने केले जेरबंद.

दिनांक ३१/०८/२०२३ रोजी मुख्य नियंत्रण कक्ष, मुंबई पोलीस येथे एका मोबाईल क्रमांकावरून फोन करण्यात आला होता. समोरून बोलणाऱ्या इसमाने स्वत:चे नाव मुकेश सिंग असे सांगुन तो गाझियाबाद, उत्तर प्रदेश येथून बोलत असल्याचे कळविले. त्याने पोलीसांना असे सांगीतले की, त्याला त्याच्या फेसबुक खात्यावर उर्दु भाषेत पोस्ट प्राप्त झाली की, **दोन पाकिस्तानी नागरीक समुद्रमार्गे मुंबई येथे येवून ताज हॉटेल उडविणार आहेत**. सदर कॉलरबाबत अधिक माहिती घेतली असता तो मुंबई येथून बोलत असल्याचे समजुन आले. त्याने केवळ नागरीकांमध्ये दहशत पसरविण्याच्या उद्देशाने खोटी माहिती पोलीसांना कळविल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. त्यावरून सांताक्रुझ पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ७१४/२०२३ कलम ५०५(१)(बी) भादंविसं प्रमाणे नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा समांतर तपास कक्ष ९, गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडून करण्यात येत होता. आरोपीने कॉल करण्यासाठी वापरलेल्या मोबाईल फोनची माहिती काढुन त्याद्वारे अधिक तपास केला असता, सदर आरोपी सांताक्रृझ परिसरात असल्याचे समजुन आले. त्यावरून सापळा रचुन त्यास सांताक्रृझ परिसरातुन ताब्यात घेण्यात आले. त्याच्या अंगझडतीमध्ये पोलीसांना खोटी माहिती देण्याकरिता वापरलेला मोबाईल फोन मिळून आला. त्यावरुन सदर गुन्हा याच आरोपीने केल्याची खात्री झाली. आरोपीने त्याचे नाव मुकेश सिंग असे सांगीतले होते. सदर नाव खोटे असून त्याचे खरे नाव व पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| नाव | :- | जगदंबा प्रसाद सिंग, वय ३६ वर्षे, व्यवसाय :- नाही, रा. ठि. :- आत्मज, मानसिंग, १५०, धोबियन पुर्वा, दुर्जनपुर, पांडे, गोंडा, उत्तर प्रदेश. |
| मुंबईचा पत्ता | :- | ब्लु हाऊस, गोळीबार रोड, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई. |

नमुद आरोपीस पुढील कायदेशिर कारवाईकरिता सांताक्रुझ पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशि कुमार मीना, पोलीस उप-आयुक्त (प्र-१) श्री. राज तिलक रौशन, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-पश्चिम) श्री. महेश देसाई यांच्या मागदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. दया नायक, पो.नि सचिन पुराणिक, स.पो.नि महेंद्र पाटील, पो.ह सुनिल म्हाळसंक, पो.ह राहुल पवार, पो.शि वैभव पाटील, शार्दुल बनसोडे, सुशांत गवते, प्रशांत भुमकर यांनी केली आहे.